## उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

जा.क्र. उमपा/वै.आ.वि/९४२६/२०२०

दिनांक : १५ ऑक्टोंबर, २०२०

**अत्यंत महत्त्वाचे/तातडीचे**

**विषय :- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील हॉटस्पॉट क्षेत्रामध्ये दि. ३१/१०/२०२० पर्यंत लॉकडाऊन सुरु ठेवणेबाबत.**

**संदर्भ :-**
**१) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७**
**२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५**
**३) महाराष्ट्र शासन, अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १३ मार्च,२०२०**
**४) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DMU-१, Dt. ३१st May,२०२०, ४th June,२०२०.**
**५) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU/२०२०/C.R.९२/DisM-१, Dt. २९th June,२०२०, Dt. २९ जुलै,२०२०, Dt. ३१ ऑगस्ट, २०२०, Dt. ३० सप्टेंबर, २०२०,**
**६) इकडील आदेश क्र. उमपा/वै.आ.वि/२२१/२०, दिनांक ०२ जुन, २०२०**
**७) इकडील आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/७५५/२०२०, दिनांक १ जुलै,२०२० व दिनांक २ जुलै,२०२०**
**८) इकडील आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/८००/२०२०, दिनांक ११ जुलै,२०२०**
**९) इकडील आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/९२८/२०२०, दिनांक २२ जुलै,२०२०**
**१०) इकडील आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/१००७/२०२०,दिनांक ३१ जुलै,२०२०**
**११) इकडील आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/१०९८/२०२०,दि. १७ ऑगस्ट,२०२०**
**१२) इकडील आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/९२०१/२०२०,दि. १ सप्टेंबर,२०२०**
**१३) इकडील आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/९२०१/२०२०,दि. १ ऑक्टोबर,२०२०**
**१४) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU/२०२०/C.R.९२/DisM-१, Dt. १४ ऑक्टोबर,२०२०**

### आदेश

१. राज्य शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक सुचना, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारांच्या अनुषंगाने लॉकडाऊन व Mission Begin Again ची टप्प्याने अंमलबजावणी दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पासून करणेसाठी मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. १३ चे आदेश काढण्यात आले होते.

२. आता संदर्भ क्र. १४ अन्वये दिनांक १४/१०/२०२० रोजी शासनाने Mission Begin Again याबाबत नवीन आदेश निर्गमित केले आहेत. त्याअनुषंगाने उल्हासनगर शहरात Containment Zone वगळता इतर भागासाठी खालीलप्रमाणे आदेश लागु राहतील.

१) शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस इ. दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०२० पर्यंत बंद राहतील. सदर संस्थांना ५० % शिक्षक तसेच इतर कर्मचाऱ्यांना ऑनलाईन शिक्षण, टेलि काऊन्सलिंब याशिवाय इतर कामांसाठी शाळेत बोलाविण्यास परवानगी देण्यात येत आहे.

याकरीता शालेय शिक्षण विभागामार्फत यासंदर्भात निर्गमित करणारे मार्गदर्शक सुचनांचे [SOP] पालन करणे बंधनकारक राहील.

२) राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, राष्ट्रीय कौशल्य विकास प्राधिकरणा अंतर्गत नोंदणीकृत अल्पकालीन प्रशिक्षण संस्था किंवा राज्य कौशल्य विकास मिशन किंवा भारत सरकार किंवा राज्य सरकार यांचेकडे नोंदणीकृत संस्था यांना कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण सुरु करण्याची मुभा राहील.

याकरीता आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय यांनी यासंदर्भात निर्गमित करणारे मार्गदर्शक सुचनांचे [SOP] पालन करणे बंधनकारक राहील.

३) उच्च शिक्षण संस्थांना ऑनलाईन / दुर शिक्षण सुरु ठेवता येईल. तथापि, उच्च शिक्षणामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधन (पी.एच.डी) व पदव्युत्तर करणारे विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा/प्रयोगिक कामासाठी परवानगी असेल.

अ) उच्च मध्यवर्ती अनुदानित शिक्षण संस्था, संस्था प्रमुख यांचे संमतीनंतर विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधन (पी.एच.डी) व पदव्युत्तर करणारे विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा/प्रयोगिके सुरु करता येईल.

ब) उच्च शिक्षणामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधन (पी.एच.डी) व पदव्युत्तर करणारे विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा/प्रयोगिक कामासाठी राज्यस्तरीय विद्यापीठ, खाजगी विद्यापीठ सुरु करता येईल.

याकरीता उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यासंदर्भात निर्गमित करणारे मार्गदर्शक सुचनांचे [SOP] पालन करणे बंधनकारक असेल.

४) शहरातील सर्व शासकीय व खाजगी ग्रंथालये [Library] यांना त्यांची कार्य सुरु करण्याची परवानगी राहील.

याकरीता कोविड-१९ च्या प्रोटीकॉलनुसार सामाजिक अंतर व निजंर्तुकीकरण यांचे पालन करणे आवश्यक राहील.

याकरीता उच्च व तंत्रशिक्षण विभागने यासंदर्भात निर्गमित करणारे मार्गदर्शक सुचनांचे [SOP] पालन करणे बंधनकारक राहील.

५) लग्न, इतर कौटुंबिक कार्यक्रम व तत्संबंधीत कार्येक्रम ५० व्यक्तींच्या संख्येच्या मर्यादेत आयोजित करण्याची मुभा असेल. अत्यंविधीला २० पेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित राहणार नाही.

६) करमणुकीसाठी गार्डन, पार्क, सार्वजनिक मोकळया जागा सुरु राहतील. मात्र तिथे कोवीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी. (उदा. मास्कचा वापर करणे, भौतिक अंतर ठेवणे वगैरे)

७) Containment Zone वगळता आठवडी बाजार (प्राण्यांसह) सुरु करण्यास परवानगी असेल. याकरीता महानगरपालिकेने यासंदर्भात निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

८) शहरातील सिनेमागृह (मॉल व व्यापारी संकुलातील सिनेमागृहासह), स्विमिंग पुल, एन्टरटेनमेंट पार्क, ऑडिटोरीयम, असेम्बली हॉल व अशाप्रकारचे अन्य हॉल तसेच Containment Zone वगळता सर्व प्रकारची दुकाने/गाळे/मार्केट सकाळी ९.०० ते रात्री ९.०० या कालावधीत खुली ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.

याकरीता महानगरपालिकेने यासंदर्भात निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

९) Containment Zone मध्ये यापुर्वी वेळोवेळी जाहीर केल्याप्रमाणे सर्व निर्बंध लागू राहतील.

१०) मात्र वरीलप्रमाणे कार्यवाही करताना नियमितपणे हॅण्डवॉश करणे, मास्कचा वापर करणे, सॅनिटायझरचा वापर करणे, भौतिक अंतर ठेवणे इत्यादी सुचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

११) उक्त आदेशाची सर्व संबंधितांनी तात्काळ अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५१ ते ६०, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ व भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम १८८ नुसार दंडनीय/कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

15/7/2020

**(डॉ. राजा दयानिधी, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**प्रत-**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
२. मा. पालकमंत्री तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
३. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
४. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग.
५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
६. मा. पोलीस आयुक्त, ठाणे.
७. मा. महापौर, मा. उप महापौर, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
८. मा.पोलिस उप आयुक्त, परिमंडळ - ४, उल्हासनगर.
९. सहाय्यक पोलिस आयुक्त, उल्हासनगर/अंबरनाथ.
१०. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, उल्हासनगर/मध्यवर्ती/विठ्ठलवाडी/हिललाईन पोलिस स्टेशन.
११. स्विय सहाय्यक, मा. आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
१२. उप आयुक्त(मुख्यालय), सर्व उप आयुक्त यांजकडे माहितीसाठी.
१३. सर्व सहाय्यक आयुक्त/सर्व विभागप्रमुख, समन्वय अधिकारी-नागरी सुविधा केंद्र.
१४. मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.